करमाळा तालुक्याचे लोकप्रिय मुखपत्र...
साप्ताहिक कमलाभवानी
# संदेश
वर्ष 34 वे
www.saptahiksandesh.com
संस्थापक संपादक डॉ.ॲड.बाबूराव हिरडे
संपादक सौ.उषादेवी बाबूराव हिरडे
वेताळ पेठ, करमाळा, जि.सोलापूर मो.९४२३३३७४८०


Shweta Gift & Toys
श्वेता गिफ्ट अँन्ड टाईज
लहान मुला-मुलींसाठी थार(जीप) 4 X 4 येथे उपलब्ध !
श्रीराम मंदिर शेजारी, वेताळपेठ, करमाळा. (9822058106 )

रजि नं.७०४९७/९८ (दिल्ली) | पोस्ट परवाना PPR/01/2021-2023 | वर्षे ३४ वे | अंक क्र.१४ | पाने-१२ | दि.३१/०१/२०२५ | दर शुक्रवारी प्रसिध्द | किंमत - ४ रू.

हॉटेल राजयोग
बायपास रोड, करमाळा., जि.सोलापूर.
व्हेज
• शुध्द शाकाहारी
• चायनीज

लॉन्स
मुंज, वाढदिवस, डोहाळे जेवण, साखरपुडा, नामकरण सोहळा, गेट-टूगेदर, कंपनी पार्टीसाठी
प्रोप्रा : राजेंद्र मोरे (मो.9503175444) सर्व सुविधा उपलब्ध..!

# नगरपरिषदेचा घनकचरा प्रकल्प येत्या दीड महिन्यात कार्यान्वीत होणार

## 'गिलेन बॅरे सिन्ड्रोम' आजाराबाबत सतर्क राहण्याचे आवाहन

करमाळा : येथील करमाळा नगरपरिषद तर्फे रोशेवाडी येथे उभारलेल्या घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प येत्या दीड महिन्यात कार्यान्वीत होणार आहे; अशी माहिती मुख्याधिकारी सचिन तपसे यांनी दिली आहे.

याबाबत माहिती देताना मुख्याधिकारी तपसे म्हणाले, की रोशेवाडी येथे यापूर्वी उभारण्यात आलेला घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प काही अडचणीने बंद पडलेला होता. तो आता येत्या ४० ते ४५ दिवसात पुन्हा नव्याने कार्यान्वीत होणार आहे. यामध्ये घनकचरा गोळा करणे, त्याची विल्हेवाट लावणे तसेच पुर्नवापर, कंपोस्टींग व लॅन्ड फिलींग अशा बाबी असतात. त्याबाबत योग्य ती कारवाई नव्याने सुरू केली जात असून हा प्रकल्प कार्यान्वीत होत आहे. करमाळा शहराचा पाणीपुरवठा सुरळीत होण्यासाठी माजी आमदार संजयमामा शिंदे यांनी सात कोटी रूपये मंजूर केले होते. त्यापैकी दीड कोटीचे दोन पंप बसविण्यात येणार आहेत. ते पंप बसल्यास पाणीपुरवठा नियमित पुरेशा दाबाने होवू शकेल. याशिवाय दहिगाव उपसासिंचनचा वीज पुरवठा हा जेऊरवरून केला जात आहे. तो पाचशे फुटाच्या आत द्यावा; याबाबत बार्शी कार्यकारी अभियंता वीज वितरण कंपनी यांचेकडे पाठपुरावा सुरू आहे. शासनाचे अनुदान उपलब्ध होताच शहरातील रस्त्याचे कामकाज करण्यात येईल; असेही मुख्याधिकारी तपसे यांनी सांगितले आहे.



गिलेन बॅरे सिन्ड्रोम हा आजार आपल्या जिल्ह्यात नाही, परंतु जिल्ह्याबाहेर आढळून आलेला आहे. त्यामुळे आपण सतर्क राहण्याची गरज आहे. या आजारात अचानक कमजोरी येते, चालण्याचा त्रास वाढतो, पोटदुखी वाढते. अतिसार जास्त दिवस होतो. ताप व मळमळ, उलट्या होतात. याकरीता नागरीकांनी हा आजार होवू नये म्हणून दुषित पाणी पिवू नये. शक्यतो उकळून गाळून पाणी प्यावे. अन्न स्वच्छ व ताजे असावे. वैयक्तीक स्वच्छतेवर भर द्यावा. रस्त्यावरचे उघड्यावरचे अन्न पदार्थ खाण्याचे टाळावे. या आजाराची लक्षणे दिसल्यास तात्काळ शासकीय रूग्णालयाशी संपर्क साधावा.

**सचिन तपसे (मुख्याधिकारी, करमाळा नगरपरिषद)**

GALAXY LODGE
गॅलेक्सी लॉज
24H SERVICE
उपलब्ध सुविधा...
- राहण्याची उत्तम सोय
- Ac / Non Ac रूम
- स्वच्छ रूम
- इलेक्ट्रीक गाड्यांसाठी चार्जिंग पॉईंटची सुविधा
- प्रशस्त पार्किंग
- मोफत Wi-Fi
- २४ तास गरम पाणी
- आरामदायक सर्व सुविधायुक्त
- लग्न समारंभ, शुभकार्य व इतर कार्यासाठी माफक दरात राहण्यासाठी रूम दिल्या जातील.





Location Scanner
बुकींगसाठी संपर्क..
प्रोप्रा : वैभव नागेश माने
फोन : (02182)359403, मो.नं.7218715416
स्थळ : करमाळा स्मार्ट सिटी, एलपीजी गॅस पंपासमोर, अ.नगर-टेंभूर्णी बायपास रोड, करमाळा. जि.सोलापूर

आयुष्य वाढवायंच ना...मग आरोग्य जपा अन् अनावश्यक बाबी टाळा..!

संपादकीय..............................................!

# ओळख स्वत:ची !

प्रत्येक व्यक्तीला नाव असते, गाव असते, धर्म असतो. याबाबी प्रत्येकाला परंपरेने मिळत आलेल्या आहेत. एवढे असूनही आपली ओळख परिपूर्ण होत नाही, मग आपली व्यावसायिक ओळख सुरू होते. पत्रकार, वकील, डॉक्टर, इंजिनीयर, चित्रकार, ठेकेदार..! पण एवढ्यावरही आपली ओळख पुरेशी होत नाही, मग गुणविशेषणावर ओळख सुरू होते. ज्ञानी,विद्वान, मुर्ख, वेडपट या विशेषणातून समाजात ओळख पसरते. गुणविशेषणातील असलेली आपली ओळख समाज आपल्याला दाखवलेच असे नाही. त्याशिवाय आपल्या सवयी, बोलणं, चालणं, स्वभाव यातूनही माणसाची वेगळी ओळख होत असते. या ओळखीत महत्वाची बाब म्हणजे आपली समाजात असलेली ओळख व स्वत:ची स्वत:ला असलेली ओळख असेही दोन भाग आहेत. त्यापैकी समाज काय म्हणून ओळखतो हे महत्त्वाचे नाही, स्वत:ची ओळख स्वत:ला असणे हे महत्त्वाचे आहे. जर स्वत:ला स्वत:ची खरी ओळख झाली तर त्यातून जीवन जगण्यात बदल घडवून समाजात वेगळी ओळख निर्माण करून देता येते.पण स्वत:ची ओळख स्वत:ला होईलच असे नाही.

आपण समाजातील कोणत्याही व्यक्तीला पाहिल्याबरोबर, बोलल्याबरोबर अथवा काही व्यवहार झाल्याबरोबर ओळखतो, की हा माणूस कसा आहे; पण स्वत:ला ओळखू शकत नाही. प्रत्येकाला स्वत:बद्दल वेगळा आत्मविश्वास असतो. आपण म्हणजे सर्वज्ञ आहोत, समाजात इतरापेक्षा मलाच जास्त कळते, अशा गोड समजुतीमधून आपण आपली वाटचाल करत असतो. त्याचे दुष्परिणाम असे घडतात की आपण आपल्या माणसापासून सुध्दा कधी आणि किती दुर गेलो हे समजतही नाही. एखाद्या कार्यालयात वरीष्ठ अधिकारी अत्यंत कर्तबगार असतो पण तो त्या कार्यालयातील कर्मचाऱ्यांना नकोसा वाटतो. घरातील कर्ता माणूस रात्रं-दिवस मेहनत करतो पण त्याला घरातून किंमत नसते. पत्नी-मुलं-मुली त्याच्यापासून दुर गेलेले असतात. कधी कधी त्याला जगणं नकोसे वाटते. नेमकं आपलं काय चुकलं याचे त्याला कधीच कळत नाही. सर्वात वाईट बाब म्हणजे एकदा का घरात/परिवारात आपली ठरावीक ओळख झाली तर ती बदलणे खुप कठीण असते. एक म्हण छान आहे.. "लोकाच्या डोळ्यातले कुसळ दिसते पण आपले मुसळ दिसत नाही" अगदी तसेच होते. अन्य लोक कसे चुकतात, ते कसा विचार करतात, त्यांच्या प्रवृत्ती कशा आहेत, हे समोरचा माणूस पटकन सांगतो.

स्वत: कोठे चुकतो याचा त्याला कधीच तपास लागत नाही. इतरांच्या चुकांचा पाढा वाचून तो कधी कधी रात्रंभर तळमळत असतो. आपण एखाद्याची चेष्टा करतो, आपणाला काहीच वाटत नाही. अगदी हसत हसत समोरच्याला नामोहरण करतो; पण जेंव्हा समोरच्याची पाळी येते व तो जेंव्हा तुम्हाला नामोहरण करतो तेंव्हा तुम्ही तळमळत रहाता. अरे यांने माझा अपमान केला आणि मस्करी करायला नको होती, तो माणूसच असा आहे, त्याची संगत नको वैगरे असे विचार येतात. कधी कधी असे लोक समोरच्यांनी वर्मावर बोट ठेवलेतर चारचौघात भांडण काढायला मागेपुढे पहात नाही.

प्रत्येक व्यक्तीला निसर्गाकडून मिळालेली बुध्दी कमी-अधिक आहे. त्याबाबत कोणालाच कोणाकडे तक्रार करण्यास संधी नसते अथवा त्याबाबत वाद घालुनही काही उपयोग नसतो. अशा बुध्दीमुळे एखादा परीक्षेत पहिल्या क्रमांकाने पास होतो तर एखादा अगदी काठावर पास होतो तर एखादा नापासही होतो. यात नापास होणे म्हणजे सर्वस्वी बुध्दीचा दोष असत नाही. संशोधक एडीसन म्हणतो.. "प्रत्येक व्यक्तीला बुध्दी २ टक्के वापरावी लागतो पण त्याला यश मिळवायचे असेलतर प्रयत्न ९८ टक्के करावे लागतात." बऱ्याच वेळा बुध्दी कमी असल्याचे भांडवल करून जीवनात शेवटच्या पायरीवर राहणे पसंत करणारे अनेकजण आहेत.आपल्या स्वभावामुळे आपली हुशारी किंवा आपले अज्ञानपण समाजात उघड होते. अनेकवेळा आपले शिक्षण, आपली प्रतिष्ठा, आपली सत्ता, आपले पद मोठे असूनही आपल्या पदरी काही पडले आहे,असे वाटत नाही. नदीत बुडी मारूनही आपण कोरडे रहावे तसे होते. तर एखादा साधा शिपाई अथवा गावचा कोतवाल असावा पण तो त्या त्या भागात भाव मारून जातो. तो स्वत:चे वेगळे वलय निर्माण करतो. असे का..? तर फक्त आपल्या स्वभावावर असे बरेच अवलंबून असते.

अनेक वेळा खुप चांगल्या संधी येवूनही आपण त्या केवळ विश्वास न ठेवल्यामुळे किंवा धाडस न केल्यामुळे गमावून बसतो. एखाद्या प्लॉट घेण्याची ऑफर येणे, फ्लॅट बाबत विचारणे होणे, एखादी जमीन घेता का म्हणून विचारले जाणे आणि आपण सहज नाकारणे आणि वर्ष दोन वर्षातच दुप्पट, चौपट किंमती होणे. अनेकवेळा असे दिसते की खुप चांगली आर्थिक स्थिती असलेला माणूस जसाच्या तसाच राहतो तर एखादा फाटका माणूस चिकाटी व धाडसाच्या जोरावर कुठल्या कुठे जातो हे समजतही नाही. थोडक्यात काय तर आपला स्वभाव. त्याचमुळे म्हटले आहे, की स्वत:ला बदला जग बदलेल ते याच कारणामुळे.

परवा माझ्या जवळच्या एका मित्राच्या नातेवाईकाचा फोन आला. ते म्हणाले, "बोलावे की नाही पण धाडस करतोय.. तुमचे मित्र घरात नीट वागत नाहीत,त्यांना पार्टीची सवय लागली आहे, नको त्यांच्या संगततीत ते रात्रं रात्रं दिवस जुगार खेळतात आणि कधी कधी पितात सुध्दा..!" मला धक्का बसला.. माझा मित्र असा होता की तो कधी सुपारी खात नव्हता, त्याला लहानपणी चप्पलसुध्दा नव्हती त्याची त्याला सतत आठवण असताना असे का झाले..? काही काहीजण एखाद्या प्रसंगाने घडण्याऐवजी बिघडतात. असे बिघडण्याचे प्रमाण खुप मोठे आहे. अनेकजण म्हणतात, माझे आयुष्य खुप त्रासात गेले, आता चांगले दिवस आले तर करा मजा म्हणत स्वत:च स्वत:ला सजा करून घेतात, घराला सजा देतात आणि जीवनाची बसवलेली घडी विस्कटतात. विशेष म्हणजे एवढे स्वत: घडल्यानंतर आपण त्याचा दोष इतरांना देतो , हे त्यातले विशेष आहे.

परवा एक व्हॉटस्ॲपवर कथा वाचली. अकबर बादशाहाने बिरबलास राज्यातील पाच अव्वल महामुर्ख शोधण्याचे काम सांगितले. बिरबलाने चार महिने मेहनत केल्यानंतर आपणास पाच महामुर्ख सापडले असून उद्या त्यांना दरबारात हजर करतो, असा निरोप दरबारात पाठवला. त्यामुळे दुसऱ्या दिवशी दरबारात प्रचंड गर्दी होती. सर्वानाच उत्सुकता होती, की बिरबल कोणत्या महामुर्खांना आणणार आहे. दुसऱ्या दिवशी बिरबल दरबारात आला परंतू त्याच्या सोबत फक्त दोनच लोक होते. राजाने बिरबलास विचारले, "अरे तुला पाच महामुर्ख आणायला सांगितले अन् तु फक्त दोघांनाच कसे आणले." त्यावर बिरबल म्हणाला, "जहापनाह मी तुम्हाला पाच महामुर्ख दाखवतो आपण मला पुर्ण बोलु द्यावे." त्याप्रमाणे राजाने "ठिक आहे मला पाच महामुर्ख दाखव म्हणजे झालं." त्यानंतर बिरबल म्हणाला, "महाराज हा महामुर्ख क्रमांक पाच, याचे नाव शेखचिल्ली. हा ज्या फांदीवर बसला होता, तीच फांदी तो तोडत होता. हे ऐकून सर्व लोक हसले. त्यानंतर बिरबलाने दुसऱ्या माणसाकडे बोट करून सांगितले. महाराज महामुर्ख क्रमांक चार हा बैलांना ओझे होऊ नये म्हणून बैलगाडीत आपल्या डोक्यावर ज्वारीचे पोते घेऊन बसला होता. जनता पुन्हा हसली. त्यावर अकबराने विचारले, "इतर तीन महामुर्ख कोठे आहेत." बिरबल म्हणाला, "महाराज तिसरा महामुर्ख मी स्वत: आहे. कारण राज्यात महागाई, बेरोजगारी, दुष्काळ असे असताना ते निवारण्याचे काम सोडून असल्या महामुर्खांचा शोध घेण्यात चार महिने घालवले.त्यामुळे तिसरा महामुर्ख मी आहे." राजा व जनता जरा वरमली. राजाने विचारले "बिरबला दुसरा महामुर्ख कोण..?" बिरबल म्हणाला, "महाराज दुसरा महामुर्ख तुम्ही..!" बादशाहा रागवला.. "मी कसा रे..?" "महाराज राज्यात एवढ्या समस्या असताना त्याकडे दुर्लक्ष करून अशा महामुर्खांच्या शोधात तुम्ही मला पाठवले व त्यातच गुंतुन राहिलात." राजाने आपला राग कसाबसा आवरला व "पहिला महामुर्ख कोण" अशी विचारणा केली. त्यावर बिरबल म्हणाला, "पहिला महामुर्ख जनता. कारण राज्यात एवढ्या समस्या असताना त्या सोडवण्यासाठी सर्वांनी एकत्र येवून प्रयत्न करण्याची गरज असताना सर्वजण असल्या महामुर्खांना पाहण्यासाठी आपला वेळ वाया घालवतात, त्यासाठी गर्दी करतात."

ही कथा राजसत्ता, प्रशासन व सर्वसामान्य जनतेसाठी वाटत असलीतरी, ती थेट प्रत्येक व्यक्तीसाठी उद्बोधक आहे. आपलं आयुष्य किती आहे. त्यात आपण प्रतिष्ठा, व्देष, पोलीसातील तक्रारी, न्यायालयातील लढाई, जातीयतेढ, धार्मिक वाद, साधे साधे प्रश्नाचे अवडंबर करून त्यात महत्वाचा वेळ खर्च करतो. पैसा कमवता येतो, वाढवता येतो, नष्ट करता येतो पण आयुष्याचे तसे नसते. आयुष्य वाढवता येत नाही पण ते वाचवता येते. जीवनातील अनावश्यक बाबी टाळल्या, आरोग्य जपले व समाधानकारक बाबीत वेळ दिला तर आयुष्य सार्थकी लागते. त्यासाठी आत डोकावून पहावे लागते म्हणजे हे सर्व समजते.

सा.कमलाभवानी संदेश हे साप्ताहिक प्रकाशक, मालक, मुद्रक सौ.उषादेवी बाबूराव हिरडे यांनी संदेश प्रिंटर्स, वेताळपेठ, करमाळा येथे संपादक म्हणून सौ.उषादेवी बाबूराव हिरडे यांनी छापून तेथेच प्रसिध्द केले. (या अंकातील मजुकराशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)

# २ फेब्रुवारीला केम येथे सोलापूर उद्योगरत्न पुरस्कार सोहळा

## मराठी सिनेअभिनेत्री सोनाली कुलकर्णी यांची उपस्थिती



करमाळा (सं.प्र.) : केम येथील युगंधर ग्रामीण सेवाभावी संस्थेच्या वतीने २ फेब्रुवारीला सायंकाळी सहा वाजता केम येथे सोलापूर उद्योगरत्न पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असून, यावेळी मराठी सिनेअभिनेत्री सोनाली कुलकर्णी यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे; अशी माहिती संस्थेचे संस्थापक अध्यक्ष विजयसिंह ओहोळ यांनी दिली. करमाळा तालुक्यातील व्यवसाय क्षेत्रातील उत्तुंग यश मिळविणाऱ्या उद्योजकांचा या सोहळ्यात सन्मान होणार आहे. तरी करमाळा तालुक्यातील नागरीकांनी या कार्यक्रमास उपस्थित रहावे; असे आवाहन ओहोळ यांनी केले आहे.

आरामदायक व सुखकर प्रवासासाठी एकच नांव...



**जय बजरंगबली टूर्स & ट्रॅव्हल्स्** पोंधवडी, ता.करमाळा.

- **वैष्णोदेवी, काश्मिर, अमृतसर दर्शन**
  माता वैष्णोदेवी, श्रीनगर, गुलमर्ग, सोनमर्ग, पेहलगाम, अमृतसर इ.
  कालावधी : दि.२८/२/२०२५ ते १३/३/२०२५
  सहल खर्च रू.२६,०००
- **नेपाळ दर्शन** (रेल्वे प्रवास ३ एसी)
  काशी, आयोध्या, प्रयागसह..
  कालावधी : दि.२२/३/२०२५ ते ४/४/२०२५
  सहल खर्च रू.२७,५००
- **गंगासागर दर्शन**
  गंगासागर, कोलकत्ता, जगन्नाथ पुरी भुवनेश्वर, कोणार्क, साक्षी गोपाळ
  कालावधी : दि.१७/४/२०२५ ते २५/४/२०२५
  सहल खर्च : रू.१२,८००
- **गुजरात दर्शन**
  गिरनार पर्वत, जुनागड, सोरटी सोमनाथ पोरबंदर, द्वारका, गिर अभयारण्य
  कालावधी : दि.२९/४/२०२५ ते ६/५/२०२५
  सहल खर्च : रू.११,०००
- **कन्याकुमारी दर्शन**
  कन्याकुमारी, त्रिवेंद्रम, मदुराई, रामेश्वरम्, तिरूपती बालाजी
  कालावधी : दि.२६/५/२०२५ ते ४/६/२०२५
  सहल खर्च : रू.१३,८००
- **चारधाम दर्शन**
  कालावधी : दि.१०/६/२०२५ ते २५/६/२०२५
  सहल खर्च : रू.३५,०००

• रेल्वे प्रवास • बस प्रवास
• भोजन व्यवस्था • राहण्याची उत्तम सोय



**बुकींग सुरू**

संपर्क श्री.मयुर राऊत

मो.८८८८३३३६३८ / ८६९८३३३६३८

### आमदार नारायण पाटील यांच्या कार्यतत्परतेने

# दहिगाव योजनेचे सर्वच्या सर्व दहा पंप कार्यान्वीत



करमाळा (सं.प्र.): दहिगाव उपसासिंचन योजनेचे रब्बी आवर्तन सुरू असून, पाणी उपसा चालू आहे. या आवर्तना पूर्वी या योजनेतील पंप हाऊस एक (दहिगाव) येथील सहा पैकी दोन पंप बंद होते तर पंप हाऊस दोन (कुंभेज) येथील चार पैकी एक पंप नादुरूस्त होता. यामुळे ही योजना सरासरी ६५ टक्के क्षमतेने पाणी उपसा करीत होती. याबाबत आमदार नारायण पाटील यांनी दहिगाव उपसा सिंचन योजनेच्या यांत्रिकी इलेक्ट्रीक व स्थापत्य विभागाची बैठक घेऊन आढावा घेतला. यामधील अडचणी जाणून घेतल्या तसेच संबंधित अधिकारी व ठेकेदार यांना मोटारी तात्काळ दुरूस्त करण्याच्याही सूचना दिल्या. यावर युध्दपातळीवर काम होवून सध्या दहिगाव उपसासिंचन योजनेच्या सर्व म्हणजे दहा मोटरी सुरू झाल्या आहेत.

याबाबत आमदार पाटील म्हणाले, की दहिगाव सिंचन योजनेचे अपूर्ण काम पूर्ण करून २५ हजार एकर क्षेत्र ओलिताखाली आणून तांत्रिकदृष्ट्या असलेल्या त्रुटी दूर करण्यासाठी अहोरात्र प्रयत्न केले जातील. वाढीव चाऱ्या अंशत: गावे व नवीन भाग यांचा समावेश करून तालुक्याच्या हक्काचे १.८१ टीएमसी लाभ क्षेत्रात उपलब्ध करून देण्याचं आपले उद्दीष्ट राहील. केवळ सर्व पंप चालू नसल्याने पाणी राखीव असूनही ते उचलले जाऊ शकत नव्हते. यामुळेच योजना पूर्ण क्षमतेने कायमस्वरूपी चालू ठेवा; असे आदेश दिले आहेत.


दहिगाव उपसासिंचन योजनेवर आपण स्वत:हून बारकाईने लक्ष ठेवून असून शेतकऱ्यांच्या अडचणी सोडविण्यासाठी कटीबध्द असल्याचे आमदार नारायण पाटील यांनी सांगितले.

दहिगाव योजनेचे सर्वच्या सर्व दहा पंप कार्यान्वीत झाल्याने पाण्याचा विसर्ग वाढला असून लाभ क्षेत्रात एकाच वेळेस तीन ठिकाणी पाणी दिले जात आहे. शेतकरी वर्गातून आमदार पाटील यांच्या कार्यतत्परतेचे कौतूक होत आहे.

# हेमंत आवटे यांची उपसरपंच पदी बिनविरोध निवड



करमाळा(सं.प्र.): वीट ग्रामपंचायतीच्या उपसरपंच पदी माजी आमदार संजयमामा शिंदे गटाचे कट्टर समर्थक हेमंत बाबुराव आवटे यांची बिनविरोध निवड करण्यात आली. ही निवड सरपंच महो गणगे यांचे अध्यक्षतेखाली पार पडली. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून कुदळे भाऊसाहेब यांनी काम पाहिले. या निवडीप्रसंगी माजी सरपंच उदय ढेरे, बाळासाहेब ढेरे, राजेंद्रसिंह राजेभोसले, सेवानिवृत्त अधिकारी गौतम जगदाळे, संदीप ढेरे, मच्छिंद्र जाधव, ग्रा.पं.सदस्य अंकुश जगदाळे, गोरख ढेरे, अंकुश जाधव, मिनीनाथ चोपडे, ज्ञानेश्वर गणगे, चंद्रकांत ढेरे, महादेव जाधव, अभयसिंह राजेभोसले, जगदीश निंबाळकर, गणेश ढेरे, धनसिंग भोंगे, विशाल गणगे, संजय ढेरे, गणेश जाधव, हरी आवटे, दिगांबर चोपडे, सुभाष आवटे, हनुमंत आवटे, विशाल गाडे, लिपीक एकनाथ जाधव, भैरवनाथ धाकतोडे, नितीन चांदणे आदीजण उपस्थित होते.



**प्रियंका आय केअर हॉस्पीटल**

पुणे रोड, त्रिमुर्ती कुशनचा वरचा मजला, करमाळा. मो.9423222266, 9604762600

उपलब्ध सुविधा... डोळ्यांच्या आजारावरील निदान व उपचार केंद्र

- मोतीबिंदू, काचबिंदू, नासूर, तिरळेपणा, दृष्टिदोष वरील निदान व उपचार
- जपानच्या अत्याधुनिक मशीनव्दारे शास्त्रोक्त पध्दतीने तपासणी व उपचार
- फॅकोइमलसीफिकेशनी बिनटाक्याची मोतीबिंदू वरील शस्त्रक्रिया.
- सुसज्ज ऑपरेशन थिएटर • नेत्रपटल आजाराचे निदान व उपचार
- लेसर मशीनव्दारे लेन्स वरील जाळी काढण्याची सोय
- एस्कॅन बायोनेट्री आणि केरॉटोमॅट्री

डॉ.डी.बी.केमकर
(M.S.DOMS) नेत्ररोग तज्ञ
कन्सल्टिंग ऑफ्थॅलमोलॉजीस्ट व ऑफ्थॅलमिक सर्जन

अत्याधुनिक प्रकारची लेझर सुविधा उपलब्ध ! (Nd YAG LASER) रविवारी बंद

वेळ : सकाळी १० ते ६ (सोमवार ते शनिवार)

आदिका मेडिकल, पुणे रोड, करमाळा., जि.सोलापूर

### सोलापूर कोर्ट प्रिमियर लीग क्रिकेट स्पर्धेत

# करमाळा कोर्ट संघाने पटकाविले प्रथम क्रमांकाचे पारितोषिक



करमाळा(सं.प्र.) : सोलापूर येथे नुकत्याच संपन्न झालेल्या सोलापूर कोर्ट प्रिमियर लीग क्रिकेट स्पर्धेत करमाळा कोर्ट संघाने यश प्राप्त करून प्रथम क्रमांकाचे पारितोषिक व चषक पटकविला आहे. ही स्पर्धा सोलापूर कोर्ट कर्मचारी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केली होती.

सोलापूर शहर न्यायालयीन कर्मचारी व न्यायाधीश साहेब सोलापूर तसेच सोलापूर जिल्ह्यातील सर्व तालुक्यातील कोर्ट कर्मचारी तसेच न्यायाधीश, प्रत्येक तालुक्यातील दोन ॲडव्होकेट सदस्य अशाप्रकारे प्रत्येकी संघामध्ये मिळून सदरील स्पर्धेत सोलापूर जिल्ह्यातील न्यायमूर्ती यांचा संघ मिळून एकूण १६ संघामध्ये रोमांचक स्पर्धा पार पडली. करमाळा कोर्ट संघाने सोलापूर येथील डिस्टीक डायमंड सोलापूर संघाचा अंतिम सामन्यात पराभव करून प्रथम क्रमांकाचे पारितोषिक व मानाचा चषक प्राप्त केला. या स्पर्धेमध्ये करमाळा कोर्टाकडून स्पर्धेतील उत्कृष्ट गोलंदाज म्हणून तसेच सेमी फायनल मध्ये मॅन ऑफ द मॅच चा पुरस्कार ॲड.अमर शिंगाडे तसेच फायनल मॅच मध्ये मॅन ऑफ द मॅच पुरस्कार कोर्ट कर्मचारी मधुसुदन धोत्रे व क्वार्टर फायनल मॅच मध्ये मॅन ऑफ द मॅचचा पुरस्कार कोर्ट कर्मचारी संतोष उडचण यांनी मिळवला.

संपूर्ण स्पर्धेत करमाळा कोर्ट संघाचे कर्णधार सचिन कोकरे, शशिकांत शेजुळ, अमोल राऊत, संतोष ओघे, सज्जन यादव, महांतेश कुंभार, ॲड.शिवराज शेरे, अक्षय बारस्कर, बालाजी कोंडेकर आदींनी मोठे योगदान दिले.

# उंदरगाव-रिटेवाडी सोसायटीच्या चेअरमन पदी दत्तात्रय कोकरे



करमाळा (सं.प्र.) : उंदरगाव-रिटेवाडी विविध कार्यकारी सोसायटीच्या चेअरमन पदी दत्तात्रय भाऊराव कोकरे यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. निवडीनंतर खरेदी-विक्री संघाचे चेअरमन शंभुराजे जगताप यांनी चेअरमन कोकरे यांना शुभेच्छा दिल्या. यावेळी सचिव बबन मेहेर, माजी चेअरमन गणपत मगर, हरिदास कांबळे, नवनाथ भिसे, संदीप मारकड, बहुजन संघर्ष समितीचे अध्यक्ष राजाभाऊ कदम, बिभिषण गरडडे, पांडूरंग निकत, शरद मगर, आत्माराम कोकरे, संभाजी रिटे, उत्तरेश्वर रिटे, संपत लड्डे, सोमनाथ भिसे, परमेश्वर कोकरे, रमेश कोकरे, विष्णू खटके, मगनदास कोकरे, धुळा कोकरे, बिभिषण मस्के, अनिल वलटे इ. उपस्थित होते.

समर्थ बालरूग्णालय स्त्रीरोग व प्रसुतीगृह
डॉ.वृषाली अभिजित हंकारे (M.B.B.S. D.G.O)
डॉ.उदयसिंह नामदेव गायकवाड (M.B.B.S. D.C.H)
उपलब्ध सुविधा.. ● गरोदर माता तपासणी व उपचार ● सुसज्ज प्रसुतीगृह व ऑपरेशन थिएटर ● नॉर्मल आणि अति जोखमीची बाळंतपणे ● मासिक पाळीचे आजार निदान व उपचार ● वंध्यत्व निवारण ● सिझेरियन प्रसुती ● गर्भशयाचे आजार निदान व उपचार ● मेनोपॉज क्लिनिक
महात्मा ज्योतिबा फुले जनआरोग्य योजने अंतर्गत गरीब व गरजू रूग्णांसाठी ठराविक गंभीर आजारावर मोफत उपचार (MJPJAY)
● नवजात अर्भक अतिदक्षता विभाग (NICU) ● व्हेंटिलेंटरची सोय
● बालरोग अतिदक्षता विभाग (PICU) ● CPAP ● Pulsoximeter
● दररोज लसीकरण सुविधा (Vaccination) ● वाफेची सोय (Nebulizer)
● बाल दमा निदान व उपचार ● सेंट्रल ऑक्सिजनची सोय ● 02 Concentrator
गायकवाड चौक, करमाळा. (०२१८२-२२००५७, ९१४६४३०५५०)

### विद्या विकास मंडळाचे सचिव

# विलासराव घुमरे यांच्या वाढदिवसानिमित्त विविध स्पर्धा व कार्यक्रम



करमाळा(सं.प्र.) : विद्या विकास मंडळाचे सचिव व यशवंत परिवाराचे आधारस्तंभ विलासराव घुमरे यांच्या ७० व्या वाढदिवसानिमित्त यशवंत युवा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवात विविध स्पर्धा घेण्यात येणार आहेत. हा महोत्सव ३० जानेवारी पासून सुरू झाला असून यामध्ये मिस मॅच डे, संगीत खुर्ची व लिंबू चमचा या स्पर्धा होणार आहेत. ३ फेब्रुवारीला रॅम्प वॉक, मिस वायसीएम व शेलापागोट्याचा कार्यक्रम होणार आहे. ४ फेब्रुवारीला सकाळी दहा वाजता महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. ५ फेब्रुवारीला सकाळी दहा वाजता भव्य रक्तदान शिबीर आयोजित केले असून ६ फेब्रुवारीला सकाळी दहा वाजता यशवंत परिवाराच्या वतीने विलासराव घुमरे यांचा ७० व्या वाढदिवसा-निमित्त सन्मान सोहळा संपन्न होणार आहे. त्यानंतर महाराष्ट्रातील सुप्रसिध्द वक्ते गणेश शिंदे यांचे 'भविष्यावर बोलू काही' या विषयावर विद्यार्थ्यांसाठी व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी पालक व विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे; असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# रमेश मुरलीधर भोसले यांना विज्ञान आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर



करमाळा(सं.प्र.): महात्मा गांधी विद्यालयाचे पर्यवेक्षक रमेश मुरलीधर भोसले यांना सोलापूर जिल्हा विज्ञान अध्यापक मंडळाचा विज्ञान आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर झाला आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी घेतलेले विशेष परिश्रम, विज्ञान विषयाची आवड निर्माण होण्यासाठी केलेले उत्कृष्ट इ. ची दखल घेत भोसले यांची या पुरस्कारासाठी निवड झाली आहे. सदर पुरस्काराचे वितरण सोलापूर जिल्हा विज्ञान अध्यापक मंडळाच्या १२ व्या वार्षिक अधिवेशनामध्ये वितरीत केला जाणार आहे. जाहीर झालेल्या या सन्मानाबाबत भोसले यांचे अभिनंदन संस्थाअध्यक्ष व माजी आमदार जयवंतराव जगताप, माजी नगराध्यक्ष वैभवराजे जगताप, खरेदी-विक्री संघाचे चेअरमन शंभुराजे जगताप, प्राचार्य बी.के.पाटील, उपप्राचार्य अनिस बागवान, पर्यवेक्षिका सुनिता नवले यांनी केले.

मस्कर ॲग्रो सर्व्हिसेस
व
सर्व सेवा केंद्र
मस्कर ट्रेडिंग कंपनी
आयडोल ठिबक व तुषार सिंचन, पारस गोल्ड
धानुका, तेजस्, स्वस्तिक पाईप, मर्सिबल, सबमर्सिबल पंप, मल्चींग पेपर, प्लंबींग हार्डवेअर मटेरियल व शेतीपयोगी साहित्य योग्य दरात मिळेल.
बायपास चौक, उड्डाण पुला जवळ, कमलादेवी रोड, करमाळा.
प्रोप्रा : कैलास काशिनाथ मस्कर, मो.9921325558, 9767655558

विघ्नहर्ता इंटीरीयर
प्रोप्रा : अभिषेक कमलेश देवी
मो.9028075051
करमाळा शहरातील एकमेव 'लॅमिनेट आणि हार्डवेअर' चे भव्य शोरूम
देवी प्लायवुड ॲन्ड हार्डवेअर
● प्लायवुड ● किचनट्रॉली ● वॉलपेपर
● हार्डवेअर ● फेव्हिकॉल ● वुडन प्लोरिंग ● सनमायका
प्रोप्रा : अभिनव कमलेश देवी 9011524252
पत्ता : मेनरोड, जैन मंदिर जवळ, करमाळा., जि.सोलापूर

न्यु. प्रविण सुपर मार्केट
रोगप्रतिकारक क्षमता आणि निरोगी बनण्यासाठी आवश्यक गावरान कडधान्य
● मटकी(बारीक गावरान) : १०० रू. किलो
● हरभरा : ८० रू. किलो
● हुलगा : ८० रू. किलो
● मुग : ११० रू. किलो
डिस्काऊंट ऑफर...
● शाबुदाणा : ६० रू. किलो
● शेंगदाणे (घुंगरू) : ८५ रू. किलो
● तुर डाळ : १४० रू. किलो
● नं.१ मटकी डाळ : ८० रू. किलो
● खारीक : १८० रू. किलो
● शारदा तारा तांदुळ : ६२ रू. किलो
● राजमा : ८० रू. किलो
शाबुदाणा व शेंगदाणा एकवेळेस अवश्य घेऊन जावा..!
● गावरान ज्वारी : ३५ रू. किलो
● गावरान गहू : ३९ रू. किलो
● गावरान बाजरी : ३४ रू. किलो
● गावरान मोठा शेंगदाणा : ९० रू. किलो
होलसेल भावात किराणा मिळेल !
ज्योती-क्रांती बँकेच्या शेजारी, दत्तपेठ, करमाळा
मो.9168052318

# जितेश पवार यांचे निधन



करमाळा (सं.प्र.) : करमाळा नगर-परिषदेचे सफाई कामगार जितेश ताराचंद पवार (वय-४०) यांचे अल्पशा आजाराने नगर येथे खाजगी रूग्णालयात उपचार चालू असताना निधन झाले आहे. त्यांच्या मागे पत्नी, लहान मुलगी, आई-वडील असा परिवार आहे. एस.टी.पार्सल विभागातील कर्मचारी ताराचंद पवार यांचे ते चिरंजीव होते. त्यांच्या अंत्यविधी प्रसंगी सर्व स्तरातील नागरीक उपस्थित होते.

सा.कमलाभवानी संदेश वार्षिक वर्गणी २०० रू.


# नाळेवस्ती या शाळेस वॉटर फिल्टर भेट




करमाळा(सं.प्र.): प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून मेजर अशोक नाळे यांचे स्मरणार्थ जिल्हापरिषद प्राथमिक शाळा नाळेवस्ती या शाळेस बापूराव नाळे यांचे तर्फे वॉटर फिल्टर भेट देण्यात आला. तसेच पिण्याच्या पाण्याची टाकीसाठी गणेश नाळे, जालिंदर नाळे, गोविंद नाळे, मधुकर नाळे, सतीश देवकते, रामदास नाळे, दादासाहेब नाळे, हनुमंत नाळे यांनी आर्थिक स्वरूपाची मदत केली. कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती म्हणून पोपट देवकते, नवनाथ नाळे, कारभारी येळे,लक्ष्मण नाळे, बाळू येळे, काशिनाथ नाळे, शिवाजी नाळे, अक्षय नाळे, परशुराम नाळे, सोमनाथ नाळे, मधुकर नाळे, गोविंद नाळे, ज्ञानेश्वर नाळे, अमोल नाळे व ग्रामस्थ उपस्थित होते. यावेळी इ.४ थी मधील विद्यार्थी श्रेयस देवकते याने हार्मोनियम वर राष्ट्रगीत वाजवून सर्वांना आकर्षित करून घेतले. तसेच इतर विद्यार्थ्यांनी मराठी, हिंदी, इंग्रजी भाषेतून मनोगत व्यक्त केले. तसेच बाल आनंद बाजार मध्ये जास्त विक्री झालेल्या विद्यार्थ्यांना बक्षीस म्हणून शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले. उपस्थितांचे स्वागत संतोष पोतदार यांनी केले तर उपस्थितांचे आभार अनुराधा शिंदे यांनी मानले.

गाळा भाड्याने देणे आहे
करमाळा शहरातील सुभाष चौकातील १५ X ५२ स्क्वे. फुट आकाराचा सुस्थितीत असलेला गाळा भाड्याने देणे
● संपर्क ●
मो.9822117174
8805193435

खुशखबर खुशखबर
मुळव्याधवर ट्रीटमेंटसाठी नको औरंगाबाद(२०८ किमी), नको मिरज (२३० किमी), आता आपल्या करमाळा (१/२ किमी) शहरात
डॉ.लोकरे हॉस्पिटल मध्ये सोमवार व गुरूवारी उपलब्ध





बार्शी येथील सुप्रसिध्द मुळव्याध तज्ञ
डॉ.विकास देविदास नागरगोजे (एम.एस.मुंबई)
उपलब्ध सुविधा...
● मुळव्याधवर इंजेक्शन ● डिलीव्हरीनंतर उद्‌भवारे कोंब ● एकदा ऑपरेशन करून पुन्हा उद्‌भवणारे कोंब ● संडासवाटे रक्त येणे, पु येणे ● संडासची जागा बाहेर पडणे ● संडास जागी खाज व आग होणे ● संडासाचा नागवेडा ● संडास नंतर बसण्यास त्रास होणे ● भगंदर, फिशर ● चार प्रकारचे मुळव्याध (४ प्रकारचे इंजेक्शन)
ओपीडी /ऑपरेशन ठिकाण
दर गुरूवार व सोमवार
वेळ : सकाळी ९.०० ते १२.००
लोकरे हॉस्पिटल
कृष्णाजीनगर, बायपास रोड करमाळा., जि.सोलापूर
(९८५०८५१००५)
परिचय
डॉ.विकास देविदास नागरगोजे
मुळव्याध तज्ञ
पदवी : नाशिक
पदवोत्तर : मुंबई



ओपीडीचे वैशिष्ट्ये...
● इंजेक्शन सुविधा ● लेझर सुविधा
● प्रभावी औषधी सुविधा ● मुळव्याधी आवश्यक ड्रेसिंग
● मेडिक्लेम सुविधा उपलब्ध ● पार्किंगची व्यवस्था
● आठवड्यातून दोनदा ओपीडी
विशेष सुचना... १. प्रत्येक ओपीडी दिवशी १० रूग्णांची तपासणी करण्यात येईल. २. येताना जुन्या आजाराची फाईल घेऊन येणे. ३. इंजेक्शनचा निर्णय डॉक्टरांचा राहील. ४. तपासणी अगोदर नावनोंदणी अनिवार्य. ५. परगावच्या रूग्णांनी आदल्या दिवशी फोन करावा.
नाव नोंदणीसाठी संपर्क
मो.9763035862
बार्शी धन्वंतरी मुळव्याध सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल कोर्ट समोर, बार्शी.

# लोकनेते नारायण (आबा) पाटील पतसंस्थेच्या चेअरमन पदी परेशकुमार दोशी



करमाळा(सं.प्र.): जेऊर येथील लोकनेते नारायण (आबा) पाटील ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थेच्या चेअरमन प्रतिष्ठीत व्यापारी परेशकुमार प्रविणकुमार दोशी यांची बिनविरोध निवड झाली आहे. लोकनेते नारायण आबा पाटील पतसंस्थेच्या चेअरमन पदाची निवडणूक सहायक निबंधक कार्यालयातील अधिकारी श्री.माने यांचे अध्यक्षतेखाली झाली. यावेळी परेशकुमार दोशी यांची एकमताने चेअरमन पदी निवड केली आहे.


या संस्थेचे चेअरमन म्हणून धुळाभाऊ कोकरे यांनी गेली अनेक वर्षे काम केले आहे. या निवडणुकी प्रसंगी धुळाभाऊ कोकरे, व्हा.चेअरमन दत्तात्रय रणसिंग, सचिव प्रा.विलास ठोकळ, भारत शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव अर्जुनराव सरक, सामाजिक कार्यकर्ते बाबासाहेब बोरकर, ग्रामपंचायत सदस्य संजयशेठ दोशी, डॉ.पराग दोशी, संतोष गुटाळ तसेच प्रतिष्ठीत व्यापारी, सर्व संचालक व ग्रामस्थ उपस्थित होते. उपस्थितांचे स्वागत संस्थेचे व्यवस्थापक शेख महंमद सलीम उमर यांनी केले तर आभार सचिव प्रा.ठोकळ सर यांनी मानले. यावेळी नूतन चेअरमन परेशकुमार दोशी यांचा सत्कार करण्यात आला. या निवडीबद्दल आमदार नारायण आबा पाटील यांनी त्यांचे विशेष अभिनंदन केले आहे.

# कै.रेखा जोशी यांच्या पुण्यतिथीनिमित्त निराधारांना अन्नदान व जनावरांना चारा वाटप



करमाळा(सं.प्र.): किल्ला विभाग येथील जोशी कुटूंबातील ज्येष्ठ भगिणी कै.रेखा पांडूरंग जोशी यांच्या प्रथम पुण्यस्मरण दिनानिमित्त विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात आले. यामध्ये जोशी कुटूंबा तर्फे श्रीराम प्रतिष्ठान मधील निराधार व गरजू लोकांना अन्नदान करण्यात आले. तसेच प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून शाळेतील चिमुकल्यांना खाऊचे वाटप करण्यात आले. सायंकाळी पांजरपोळ गोरक्षण संस्थेत गाईंना हिरवा चारा देण्यात आला. यावेळी भरतकुमार दोशी, महेश परदेशी, शेखर जोगळेकर, जाकीर पठाण व जोशी कुटूंबातील सर्व सदस्य उपस्थित होते.

शुध्द.. स्वच्छ..स्वादिष्ट नी रूचकर..!
चिवटे उपहारगृह



| साऊथ इंडियन | नाष्टा | स्नॅक्स | चाट | स्विट | नमकिन |
|---|---|---|---|---|---|
| इडली सांबर, उडीदवडा सांबर, उत्तप्पा, डोसा | पुरी भाजी, मिसळ पाव, पोहे/उपमा, दहीवडा/शिरा | पावभाजी, तवापुलाव, सँडविच, फिंगर चिप्स | पाणीपुरी, स्पे.भेळ, रगडा पॅटिस, राज कचोरी | पेढा, बर्फी, लाडू, जामून, मैसुरपाक, काजू कतली | फरसान, शेव, स्पे.चिवडा, पापडी |

डेअरी: दही, दुध, खवा, पनीर, बासुंदी, लस्सी
साऊथ इंडियन, नमकिन, नाष्टा, स्वीट, चाट, डेअरी, उपवास पदार्थ मिळतील.
एकवेळ अवश्य भेट द्या..!
राशिनपेठ, करमाळा. मो.८८८८१४७००५
कोल्ड्रींक: कोल्डकॉफी, ज्युस, मिल्कशेक, आईस्क्रीम

श्री गजानन अगरबत्ती
● सुगंधी अगरबत्ती ● कापूर
● अत्तर ● धूप ● भीमसेन कापूर,
● विविध कलरची रांगोळी
● सर्व प्रकारचे लोबन,
● सर्व प्रकारचे पुजेचे साहित्य योग्य दरात मिळेल !



पत्ता : वेताळपेठ, करमाळा., जि.सोलापूर
(प्रोप्रा : निखिल प्रदीप ढाळे, मो.8007255456)


करमाळा शहरातील
विकी मंगल कार्यालय
आता अहमदनगर मधील सुप्रसिध्द
५० वर्षापासून रूचकर स्वाद सेवा पुरविणारे
श्री रूपाली केटरर्स
अंतर्गत !
विकी मंगल कार्यालय
मुख्य शाखा : २३०२, आडते बाजार, अहमदनगर (महाराष्ट्र)
मंगलकार्य तुमचे.., स्वाद सेवा व व्यवस्थापन आमचे !
वाढदिवस, सेमीनार व इतर लहान समारंभाकरीता आकर्षक पॅकेज उपलब्ध !
श्री रूपाली केटरिंग सर्व्हिसेस
वैशिष्ट्ये
● मुख्य फंक्शन हॉल
● स्वतंत्र डायनिंग हॉल
● सहा प्रशस्त अटॅच्ड रूम्स
● प्रशस्त किचन व वॉशिंग प्लेस
● डायनिंग हॉल मध्ये स्वतंत्र खुर्ची व टेबल व्यवस्था
● सर्व ठिकाणी फॅनची सुविधा
● जनरेटर सुविधा उपलब्ध
● स्नान करीता गरम पाण्याची सोय
● भव्य व सुरक्षित पार्कींग व्यवस्था
● सर्वात महत्वाचे श्री रूपाली केटरर्स तर्फे आमची लज्जतदार स्वाद सेवा
● महाराष्ट्रीयन
● राजस्थानी
● गुजराती
● पंजाबी
● साऊथ इंडियन
● चायनीज
● इटालियन
प्रोप्रा : रामकुमार खंडेलवाल (खंडू महाराज)
बुकींगसाठी संपर्क
श्रीनिवास खंडेलवाल (9890146800 / 9150306666) । कपिल खंडेलवाल (9881158713 / 9420748889)


उपमुख्यमंत्री ओ.एस.डी.
उपमुख्यमंत्री
खासदार
उपमुख्यमंत्री मा.एकनाथजी शिंदे साहेब यांचे
ओ.एस.डी. म्हणून करमाळ्याचे सुपुत्र
श्री.मंगेश मंदाकिनी नरसिंह चिवटे
यांची नियुक्ती झाल्याबद्दल..
हार्दिक अभिनंदन
जिल्हाप्रमुख, शिवसेना
सदस्य, सो.जि.नि.समिती
जिल्हा उपप्रमुख
ज्योतीताई शिंदे
शिवसेना महिला आघाडी
अंकुश जाधव
अनिल पाटील
संजय शिलवंत
राहुल कानगुडे
चंद्रकांत राखुंडे
डॉ.गौतम रोडे
सौ.किर्ती स्वामी
शुभेच्छुक
शिवसेना करमाळा शहर व तालुका


उपमुख्यमंत्री
खासदार
जिल्हाप्रमुख, शिवसेना
ता.अध्यक्ष
अनिल पाटील
ता.उपाध्यक्ष
गौतम रोडे
जिल्हा उपप्रमुख
ज्योतीताई शिंदे
शिवसेना महिला आघाडी
करमाळ्याचे सुपुत्र
श्री.मंगेश(दादा) मंदाकिनी नरसिंह चिवटे
यांची संवेदनशील उपमुख्यमंत्री मा.एकनाथजी शिंदे
यांच्या विशेष कार्य अधिकारी(ओ.एस.डी) पदी नियुक्ती
तसेच उपमुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष मंत्रालयाच्या
कक्षप्रमुख पदी निवड झाल्याबद्दल
हार्दिक अभिनंदन !
शुभेच्छुक
शाखाप्रमुख, रंभापुरा
शिवसेना वैद्यकिय सहाय्यक
जेऊर शिवसेना वैद्यकिय मदत कक्ष संपर्कप्रमुख
राजेंद्र मेरगळ
मिलींद चव्हाण
प्रदीप बनसोडे
नागेश चेंडगे
संजय जगताप
सिध्देश्वर धस
बाबासाहेब तोरणे
आजिनाथ इरकर
केशव साळुंखे, रोहिणी फंड, सविता पवार, सुमैय्या बागवान, जस्मीन खान, आशा नंदरगे, स्वाती बनसोडे, समीना मुलाणी,मंगल लांडगे,
राजश्री रोडे, अश्विनी गोफणे, ज्योती माळवे, चित्रा डाळे


उपमुख्यमंत्री
खासदार
जिल्हाप्रमुख, शिवसेना
सदस्य, सोलापूर जि.नि.समिती
शिवसेना
जिल्हा उपप्रमुख
ज्योतीताई शिंदे
शिवसेना महिला आघाडी
ता.प्रमुख, शिवसेना
अनिल पाटील
ता.उपप्रमुख, शिवसेना
करमाळ्याचे सुपुत्र
श्री.मंगेश(दादा) मंदाकिनी नरसिंह चिवटे
यांची राज्याचे संवेदनशील उपमुख्यमंत्री मा.एकनाथजी शिंदे यांच्या विशेष कार्य अधिकारी
(ओ.एस.डी) पदी नियुक्तीतसेच उपमुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष मंत्रालयाच्या
कक्षप्रमुख पदी निवड झाल्याबद्दल..
हार्दिक अभिनंदन !
शुभेच्छुक
• डॉ.गौतम रोडे (उपतालुकाप्रमुख, शिवसेना)
• छत्रपती दूध संकलन व शीतकरण केंद्र परांडा व करमाळा
• जय हनुमान दूध संकलन केंद्र, आळजापूर • शिवाजी पाटील (चेअरमन- गुळसडी)
डॉ.गौतम रोडे

# गणेशोत्सव मंडळाच्या स्पर्धेतून छत्रपती शिवाजी महाराज तरूण मंडळास प्रथम क्रमांकाचे बक्षीस

## राशीनपेठ, किल्ला विभाग लोकमान्य टिळक तरूण मंडळास द्वितीय व तृतीय क्रमांक - सरकार मित्र मंडळाचा सन्मान







करमाळा (सं.प्र.) : करमाळा पोलीस स्टेशन तर्फे गणेशोत्सव काळात उत्कृष्ट देखावा व शांततेत श्री गणेश मिरवणूक काढल्याबद्दल करमाळा शहरातील सावंत गल्ली येथील श्री छत्रपती शिवाजी महाराज तरूण मंडळास उपविभागीय पोलीस अधिकारी अजित पाटील यांचे हस्ते प्रथम क्रमांकाचे प्रमाणपत्र मंडळाचे अध्यक्ष संदीप दुधाळ यांना देण्यात आले.

व्दितीय क्रमांक राशीनपेठ तरुण मंडळ व तृतीय क्रमांक किल्ला विभाग लोकमान्य टिळक तरूण मंडळास देण्यात आला. तसेच गणेशोत्सव स्थापनेपासून ते विसर्जन पर्यंत तसेच वर्षभर सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रम कायमस्वरूपी राबवत असल्याबद्दल करमाळा शहरातील सरकार मित्र मंडळाचा करमाळा पोलीस कार्यालयाकडून विशेष सन्मान करण्यात आला. यावेळी मंडळाचे मार्गदर्शक विजय लावंड, सचिन घोलप व मंडळाचे सदस्य उपस्थित होते.

दरवर्षी गणेशोत्सवात प्रत्येक गणेश मंडळांची मिरवणूक जामा मस्जिद येथे आल्यानंतर जामा मस्जिदकडून पुष्पवृष्टी करून स्वागत केले जाते. तसेच मंडळाच्या पदाधिकाऱ्यांचे व मिरवणुकीतील बंदोबस्ता साठी असणारे पोलीस बांधव यांचे फेटा बांधून व हार घालून सत्कार केला जातो. हिंदू-मुस्लिम ऐक्य व सामाजिक सलोखा जपणाऱ्या जामा मस्जिदचे विश्वस्त व अध्यक्ष जमीर सय्यद यांचाही ट्रॉफी व प्रशस्तीपत्र देऊन सन्मान करण्यात आला.

गणेशोत्सव काळातील उल्लेखनीय सामाजिक कार्याबद्दल उमरड येथील जय भवानी तरूण मंडळाचाही गौरव पोलीसांकडून करण्यात आला. केम बीट मधून डिजे न वाजवता पारंपारिक वाद्यांसह मिरवणूक काढल्याबद्दल व सामाजिक सलोखा राखत सामाजिक उपक्रम राबविल्याबद्दल केम येथील टिळक चौक गणेश मंडळास प्रथम क्रमांक देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. हा सन्मान मंडळाचे मार्गदर्शक राहुल कोरे, धनंजय सोलापूरे, ओंकार सोलापुरे यांनी स्वीकारला.

## रिटेवाडी उपसा सिंचन योजनेबाबत
# ४ फेब्रुवारीला मंत्रालयात बैठक

करमाळा(सं.प्र.): प्रस्तावित रिटेवाडी उपसा सिंचन योजनेचा सर्व्हे तातडीने होऊन सरदची योजना गतीने पूर्ण होण्यासाठी ४ फेब्रुवारी रोजी मंत्रालयात सकाळी ११ वाजता स्वतंत्र बैठक आयोजित केली असल्याची माहिती मकाई कारखान्याचे माजी चेअरमन दिग्विजय बागल यांनी दिली.

याबाबत श्री.बागल म्हणाले, की १६ जानेवारी रोजी राज्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांना रिटेवाडी उपसासिंचन योजने संदर्भात सर्व्हे तातडीने करावा म्हणजे सदरची योजना गतीने पूर्ण होण्याबाबत मंत्रालयीन पातळीवर संबंधित अधिकाऱ्यांची स्वतंत्र बैठक आयोजित करावी; असे लेखी पत्र दिले होते. सदर पत्राची दखल घेत जलसंपदा मंत्री विखे-पाटील यांनी येत्या ४ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता मंत्रालयात रिटेवाडी उपसासिंचन योजनेबाबत स्वतंत्र बैठक आयोजित केली आहे. या बैठकीस महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाचे व जलसंपदा विभागाचे वरीष्ठ अधिकारी उपस्थित राहणार आहेत. रिटेवाडी उपसासिंचन योजनेबाबत स्वतंत्र बैठकीचे आयोजन झाल्यामुळे योजनेच्या कामाला आता निश्चित गती येईल; असा विश्वास दिग्विजय बागल यांनी व्यक्त केला.

# म.फुले जनआरोग्य योजनेत करमाळ्यातील हॉस्पिटल वाढवणार : प्रकाश अबिटकर

करमाळा(सं.प्र.): करमाळा तालुक्यातील फक्त दोन हॉस्पिटल महात्मा फुले जनआरोग्य योजनेत समाविष्ट असून पुढील काळात किमान दहा ते पंधरा हॉस्पिटल या योजनेत समाविष्ट करू; असे आश्वासन आरोग्यमंत्री प्रकाश अबीटकर यांनी दिले.

शिवसेना जिल्हाप्रमुख महेश चिवटे यांनी या संदर्भात आरोग्य मंत्री अबीटकर यांना निवेदन दिले. यावेळी सोशल मिडीया संघटनेचे राज्य सचिव सतीश सावंत, तालुका समन्वयक निलेश राठोड, विनोद महानवर, बाबा तोरणे, दिपक पाटणे आदीजण उपस्थित होते. करमाळा तालुक्यात महात्मा फुले जनआरोग्य योजनेच्या हॉस्पिटल नसल्यामुळे सर्वसामान्य रूग्णांना कार्ड असून सुध्दा मोफत उपचार मिळत नाहीत. या योजने मार्फत पाच लाखापर्यंत उपचार मोफत मिळतात. या योजनेतून सर्व प्रकारचे ऑपरेशन होतात. मात्र करमाळ्यात ही योजना उपलब्ध असलेले



हॉस्पिटल नाहीत. यामुळे रूग्णांना भरमसाठ पैसे भरावे लागतात. यावेळी आरोग्य मंत्री अबीटकर म्हणाले, की ज्या हॉस्पिटलचे प्रस्ताव येतील त्यांना तात्काळ मंजुरी देऊ व करमाळा नो कॅश काऊंटर हॉस्पिटल चालू करण्यासाठी स्वातंत्र्य सैनिक मनोहरपंत चिवटे मल्टी स्पेशालिस्ट हॉस्पिटलला सर्वतोपरी सहकार्य करू. तसेच ७ मार्चला करमाळ्यात महाआरोग्य शिबीर घेण्यात येणार असून या शिबीराच्या उद्घाटनाला उपस्थित राहू; असे आश्वासन आरोग्यमंत्री अबीटकर यांनी दिले.

## जागा विकणे आहे

करमाळा शहरातील भवानीपेठेतील रोडटच असलेली (३८ X १६७) एकूण ६३५० स्क्वे.फूट जागा योग्य किंमत आल्यास त्वरीत विकणे आहे.

संपर्क : मो.8888400555

## डॉ.शेलार हॉस्पिटल

नवीन प्रशस्त जागेत नवीन रूपात...
दि.२६ जानेवारी पासून
स्थलांतर



नवीन पत्ता : ICICI बँकेच्या पाठीमागे, श्रावणनगर, करमाळा.

टीप : हॉस्पीटल कामासाठी स्टाफ पाहिजे. गरजूंनी संपर्क करावा..!

संपर्क : डॉ.शेलार (9922957895)

## जागा विकणे आहे

करमाळा शहरातील मेनरोड वरील अत्यंत मोक्याची असलेली जागा (२५ X ७०, एकूण १७५० स्क्वे.फुट, जुनी युनीयन बँक ऑफ इंडिया, शहा हॉस्पीटल समोरील) योग्य किंमत आल्यास विकणे आहे.

संपर्क

मो.9881097828, 9822029420, 9822553464

## पुनम एजन्सी

अंबुजा सिमेंटचे
करमाळा तालुका वितरक

• बिल्डींग मटेरियल सप्लायर्स • प्लंबींग • हार्डवेअर
स्टील, सिमेंट, फरशी, ग्रेनाईट
होलसेल व रिटेल योग्य दरात मिळेल

प्रोप्रा : प्रमोद शिंदे (9552946544) पत्ता: बायपास रोड, जेऊर.



# करमाळा शहर विकासासाठी २१ कोटी ७५ लाख रकमेचा प्रस्ताव तयार

## नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांचे आदेश



करमाळा(सं.प्र.) : करमाळा शहर विकासासाठी २१ कोटी ७५ लाख रूपयांचा प्रस्ताव तयार करून जिल्हाप्रमुख महेश चिवटे यांनी नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांचेकडे सादर केला. या सर्व कामाचे अंदाजपत्रक तयार करून ठराव निश्चित करून घ्यावेत; असे आदेश विकासमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले. मुंबई येथे नंदन बंगल्यावर जिल्हाप्रमुख चिवटे यांनी एकनाथ शिंदे यांची भेट घेऊन प्रस्ताव सादर केला. यामध्ये करमाळा शहरातील सर्व बाजुने येणाऱ्या रस्त्यांचे सुशोभिकरण करणे, रोह डिव्हाइडर करणे तसेच श्रावणनगर, गणेशनगर, मुथानगर व शहरातील प्रमुख अंतर्गत रस्ते सर्वत्र नवीन स्ट्रीट लाईट बसविणे, नगरपालिकेच्या ओपन पेस मध्ये वृक्षारोपण करणे, करमाळा शहर ते श्रीदेवीचामाळ रोड सुशोभिकरण करणे असा सर्व एकत्रित प्रस्ताव देण्यात आला आहे. नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांनी तात्काळ यावर स्वाक्षरी करून प्रस्ताव मागून घ्या; असे आदेश नगरविकास सचिव सचिन सहस्त्रबुध्दे यांना दिले आहेत.

सुधारीत पाणीपुरवठा योजना अमृत टू जलशुध्दीकरण प्रकल्प व भुयारी गटार योजना याचा शासन दरबारी ३२० कोटी रूपयांचा प्रस्ताव पडून असून या कामाबाबतच्या कागदपत्रातील त्रुटी दूर करून आवश्यक त्या जागा संपादीत करून करमाळ्याचे प्रकल्प मार्गी लावण्यासाठी तात्काळ उपाययोजना करा; असाही आदेश नगरविकास सचिव यांना दिले आहेत.

## करमाळा नगरपरिषद, करमाळा.

### जाहीर आवाहन

करमाळा शहरातील सर्व नागरीकांना या जाहीर आवाहनाद्वारे कळविण्यात येते, की.. गिलेन – बॅरे सिंड्रोम (GBS) हा आजार सद्यस्थितीमध्ये बाहेर जिल्ह्यामध्ये आढळून आलेला आहे. तरी तो सोलापूर जिल्ह्यामध्ये अद्याप आढळून आलेला नाही. तरी या आजाराची सर्वसाधारण लक्षणे व त्याबाबत नागरीकांनी घ्यावयाची काळजी याबाबत सदर जाहीर प्रसिध्दीकरणाद्वारे नागरीकांना कळविण्यात येत आहे..

**● आजाराची सर्वसाधारण लक्षणे...**

१) अचानक पायातील किंवा हातात येणारी कमजोरी/लकवा

२) अचानकपणे उद्भवलेला चालण्यातील त्रास किंवा कमजोरी

३) अतिसार(डायरिया) जास्त दिवस ४) पोटदुखी ५) ताप व मळमळ किंवा उलट्या होणे.

**नागरीकांनी घ्यावयाची काळजी...**

१) पिण्याचे पाणी दुषित राहणार नाही याची काळजी घेणे आवश्यक आहे.
उदा.. पाणी उकळूनच घेणे.

२) अन्न स्वच्छ आणि ताजे असावे.

३) वैयक्तीक स्वच्छतेवर भर देण्यात यावा.
(उदा.खाण्यापूर्वी आणि शौचालया वापरल्यानंतर साबणाने हात स्वच्छ धुवावे.)

४) शिजलेले अन्न आणि न शिजलेले अन्न एकत्रित न ठेवल्यासही संसर्ग टाळता येईल.

५) रस्त्यावरचे, उघड्यावरील पदार्थ खाणे टाळावे.

खाजगी वैद्यकिय व्यावसायिकांनी जीबीएस रूग्ण आढळून आल्यास त्वरीत शासकीय आरोग्य यंत्रणांना कळवावे. नागरीकांनी घाबरून न जाता या आजाराची लक्षणे आढळल्यास त्वरीत शासकीय रूग्णालयाशी संपर्क साधावा. तरी वरील सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे; असे करमाळा नगरपरिषदेच्या वतीने जाहीर आवाहन करण्यात येत आहे.

**श्री.सचिन तपसे**
(मुख्याधिकारी, करमाळा नगरपरिषद करमाळा.)


# लखमीचंद क्लॉथ स्टोअर्स



**होलसेल साडी डेपो व लेडीज, किड्स वेअर**

प्रिंटेड साडी, कांजीवरम् साडी, काटपदर साडी
कॉटन साडी, पार्टीवेअर साडी,लेडीज टॉप व कुर्ती,
लेगीज, किड्स वेअर योग्य दरात मिळतील.

टीप : आहेराच्या साड्या व इतर साड्या होलसेल दरात मिळतील.

**विशेष ऑफर :** कॉटन परकर फक्त १०० रू. मध्ये मिळेल

**पैठणी साड्यांचा भरपूर स्टॉक उपलब्ध**



**पत्ता : छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्याजवळ, भवानीपेठ, करमाळा.(९१७२०९२१८७)**


# कमलादेवी मंदिराच्या कामासाठी ६० हजार रूपयाची देणगी



करमाळा(सं.प्र.): श्रीदेवीचामाळ येथील कमलादेवी मंदिराच्या जतन व संवर्धनाच्या कामासाठी कै.विश्वनाथ मारूती पडवळ गुरूजी यांच्या स्मरणार्थ श्रीमती योजना शिवाजीराव गायकवाड (रा.धाराशिव) यांनी ५० हजार रूपयाची आर्थिक मदत कमलादेवी मंदिर ट्रस्टकडे दिली आहे. याबद्दल ट्रस्टच्या वतीने अध्यक्ष सोमनाथ चिवटे यांचे हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच करमाळा शहरातील कृष्णा एजन्सीचे मालक हेमंत देवी यांनी कमलादेवी मंदिराच्या जतन व संवर्धनाच्या कामास दहा हजार रूपयांची देणगी दिली. त्याबद्दल मंदिर समितीच्या वतीने हेमंत देवी यांचा कमलादेवीची प्रतिमा भेट देवून सत्कार करण्यात आला. यावेळी सचिव अनिल पाटील, विश्वस्त सुशील राठोड, मंदिर पुजारी बापू पुजारी, व्यवस्थापक अशोक गाठे, गोकुळदास रामचंद्र नेरे, कुसूम विश्वनाथ पडवळ, सविता गोकुळदास नेरे, सुहास मालाडे, प्रसाद गायकवाड, प्रज्योत गायकवाड व पडवळ परिवार, गायकवाड परिवार उपस्थित होते.

# हुलगेवाडी येथील मुख्यमंत्री सौरऊर्जा प्रकल्प बंद करा - ग्रामसभेत ठराव मंजूर

करमाळा(सं.प्र.) : कोर्टी ग्रामपंचायत अंतर्गत असलेल्या हुलगेवाडी येथील सुरू असलेला मुख्यमंत्री सौरऊर्जा प्रकल्प तात्काळ बंद करा; अशा मागणीचा ठराव कोर्टी ग्रामपंचायतीच्या ग्रामसभेत एकमताने मंजूर करण्यात आला आहे. हा ठराव २६ जानेवारीला सरपंच भाग्यश्री सुदाम नाळे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सभेत मंजूर करण्यात आला आहे. हा प्रकल्प चालू झाल्यास वाडीतील नागरीकांचे आरोग्य धोक्यात येणार आहे. तसेच जनावरांच्या आरोग्याचा व चाऱ्याचा प्रश्न निर्माण होणार आहे. या प्रकल्पाचा फायदा होण्याऐवजी तोटा होणार असल्याने हा प्रकल्प बंद करण्यात यावा; अशी सूचना लालासाहेब हुलगे यांनी मांडली तर ज्ञानेश्वर हुलगे यांनी अनुमोदन दिले. सदरचा ठराव सभेत एकमताने मंजूर करण्यात आला आहे.


करमाळा शहरात प्रथम सुरू..!

Reg no.42433

**डॉ.सौ.अर्चना दिनेश पाटील**
( Clinical Cosmetologist & Trichologist )

# पाटील
## स्किन, हेअर ॲन्ड जनरल क्लिनिक

उपलब्ध सुविधा

● **त्वचा :** P.R.P. चिकित्सा, I.P.R.F. चिकित्सा, P.R.P. मायक्रोनीडलिंग, ॲंटी येजिंग थेरपी, मुरूम व मुरूमाचे डाग घालवणे, वांग व व्रण घालवणे, चेहऱ्यावरील सुरकुत्या घालवणे, ब्रायडल फेशियल, मेडी फेशियल, हायड्राफेशियल, स्किन पोलिशिंग, चामखीळ काढणे, मस काढणे, पर्मनंट आयब्रो, पर्मनंट लिप कलर

● **केस :** P.R.P.चिकित्सा, I.P.R.F.चिकित्सा, I.J.F.C.थेरपी, टक्कल पडणे, केस गळणे, केसातील कोंडा घालवणे, केसांची वाढ खुंटणे, केस पांढरे होणे, चाई पडणे

● सर्व आजारांवर उपचार ● रक्त लघवी तपासणी ● लहान मुलांना वाफ देणे
● सांधेदुखी, कंबरदुखी ● होमिओपॅथिक उपचार



**पत्ता : संगोबा रोड, श्रीदेवीचामाळ, करमाळा. मो.9604801573**

# एस.टी.वाहकाची अरेरावी : प्रवाशाची बॅग फेकून केले लॅपटॉपचे नुकसान

करमाळा (सं.प्र.) : एसटीनेच प्रवास करावा.. यासाठी राज्य परिवहन महामंडळ विविध प्रयत्न करत आहे. अशा या प्रयत्नावर एसटीतील काही कर्मचारी पाणी फिरवत आहेत. याची प्रचिती नुकतीच आली असून परांडा डेपोच्या वाहकाने वीट येथे प्रवाशास शिव्या देऊन त्याची बॅग एसटीच्या खाली फेकून देवून बॅगेतील लॅपटॉप फोडला आहे. एवढेच नाहीतर या प्रवाशास एसटीतून खाली उतरवून एसटी घेऊन गेला आहे. हा प्रकार २६ जानेवारीला सव्वाअकरा वाजता घडला आहे. यात आवाटी येथील उबेद राजू खान या विद्यार्थ्याने फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, की मी आकुर्डी येथे पॉलिटेक्नीक कॉलेजमध्ये पहिल्या वर्षाला शिक्षण घेत आहे. सुट्टी असल्याने गावाकडे आलो होतो. कॉलेजला जाण्यासाठी २६ जानेवारीला सकाळी दहा वाजता परांडा डेपोच्या परांडा– पुणे या बसमध्ये बसलो होतो. त्यावेळी तिकीटाची रक्कम वाहक विजय बाबू वाघमारे यांना विचारले असता त्यांनी रूपये ३७३ सांगितली. माझ्याकडे पैसे सुट्टे नसल्याने त्यांना ५०० रूपये दिले. पुढे वीट येथे आल्यानंतर राहिलेले शिल्लक १२७ रूपये मागितले. त्यावेळी वाहक विजय वाघमारे यांनी शिव्या देऊन तुला समजत नाही का.. असे म्हणून माझ्या साहित्याची बॅग बस मधून खाली फेकून दिली. त्या बॅगमधील माझ्या लॅपटॉपचे नुकसान झाले आहे. तसेच मला खाली उतरवून निघून गेला. त्यानंतर मी व माझे वडील खाजगी गाडीने भिगवण डेपोत गेलो असता, तेथील डेपो मॅनेजरला ही तक्रार सांगितली. त्यावेळी डेपो मॅनेजरने माझे १२७ रूपये परत दिले. या प्रकरणी पोलीसांनी वाहकाच्या विरूध्द गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सहाय्यक पोलीसनिरीक्षक पोपट टिळेकर हे करत आहेत.

# पगार न देणाऱ्या कॉन्ट्रॅक्टर विरूध्द गुन्हा दाखल

करमाळा(सं.प्र.) : वीज वितरण कंपनीत काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचा पगार एमएसईबी कार्यालयकडून मिळवूनही कॉन्ट्रॅक्टर व सुपरवायझर यांनी पगार दिला नाही. त्यामुळे कामगारांनी त्यांच्या विरूध्द फसवणुकीचा गुन्हा दाखल केलेला आहे. या प्रकरणी बाळू विष्णू भांडवलकर (रा.वडगाव उ) यांनी फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, की मी व माझा मित्र तात्या साहेबराव वीर (रा.पांडे) आम्ही विज वितरण कंपनीच्या सोनू सर्व्हिसेस या कंपनीच्या कॉन्ट्रॅक्टरकडे काम करत आहोत. वीज वितरण कंपनीने आमचा पगार कॉन्ट्रॅक्टरकडे जमा करूनही कॉन्स्ट्रॅक्टर आशपाक शेख व सुपरवायझर इकबाल इनामदार यांनी २ लाख ५९ हजार रूपयाचा पगार आम्हाला न देता फसवणूक केली आहे. यात पोलीसांनी गुन्हा दाखल केला आहे.

## सावधानतेची जाहीर नोटीस

जिल्हा सोलापूर, तालुका करमाळा, गाव करमाळा (ग्रामीण) येथील तमाम रहिवाशांना सदर सावधानतेच्या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की.. **१)** सदर जिल्हा सोलापूर, तालुका करमाळा, गाव करमाळा (ग्रामीण) येथील शेतजमीन याचा गट नं.२२५/४ त्याचे क्षेत्र १.६६ आर आणि गट नं.२२५/२ त्याचे क्षेत्र १.८० आर. सदरची शेतजमीन आमचे अशिलांचे आजोबा कै.विश्वनाथ भणगे यांचे स्वकष्टार्जित मालकीची व कब्जेवहिवाटीची होती व आहे. सदर विश्वनाथ भणगे यांना सौ.अंबिका व विजया अशा दोन विवाहित पत्नी होत्या. सदर विश्वनाथ भणगे व त्यांच्या दोन्ही पत्नी मयत झालेल्या आहेत. सदर कै.अंबिका विश्वनाथ भणगे यांना त्यांचे पती विश्वनाथ भणगे यांच्या पासून प्रकाश आणि मंगला उर्फ प्रमिला अशी अपत्ये आहेत. सदर प्रकाश हा मयत असून त्याला अमित, राहुल आणि गायत्री अशी अपत्य आहेत. सदर मंगला उर्फ प्रमिला हिस सुरेखा, सुहासिनी, सुनंदा, सुधा, कल्पना, प्रतिभा, शुभांगी अशा सात मुली असून प्रशांत नावाचा एक मुलगा आहे. २) सदर कै.विजया हिला विश्वनाथ भणगे यांचे पासून प्रभाकर, प्रमोद, दिपक, प्रविण अशी चार मुले तर विमल उर्फ वैशाली अशी मुलगी अशी अपत्ये झालेली आहेत. सदर विजया ही विश्वनाथ भणगे यांची विवाहाची दुसरी पत्नी आहे. सदर वंशावळी व वारसाची वर नमूद केल्याप्रमाणे खरी वस्तुस्थिती असताना, सदर सुनंदा व्यंकटेश सत्येगिरी आणि प्रतिभा जगदीश कुलकर्णी आणि प्रशांत दत्तात्रय दुसे यांनी मिळून संगणमताने सदर वर नमूद परिच्छेद १ मधील शेतजमीन ही इतर वारसांचा हक्क व हिस्सा डावलून सुनंदा हिने तिचा मुलगा राघवेंद्र तर प्रतिभा हिने तिचा मुलगा ओंकार आणि प्रशांतने स्वत:ची नावे सदर मिळकतीवर बेकायदेशीररित्या नाव लावून घेतले आहे आणि सदरची शेतजमीन फक्त त्यांच्या मालकीची आहे; असे दर्शवून व भासवून विक्री करणार असल्याचे आमचे अशिलांना खात्रीपूर्वक समजलेले आहे. सदर शेतजमीनीमध्ये आमचे अशिल सौ.सुधा उर्फ प्राजक्ता प्रशांत बडवे रा.सोलापूर (मो.९८२२०९७६६८८) यांचा प्रत्यक्ष असा अविभक्त हिस्सा असून ते त्याचे मालक आहेत. सदर शेतजमिनीच्या कोणत्याही लेखी अथवा तोंडी वाटण्या झाल्या नसून, सदर आमचे अशिलांचे आजोबा कै.विश्वनाथ भणगे अथवा आमचे अशिलांच्या आजी अंबिका आणि विजया यांनी मृत्यूपूर्वी सदर शेतजमिनीबाबत कोणतेही मृत्यूपत्र लिहून ठेवलेले नाही अथवा वाटण्या देखील केलेल्या नाहीत. सबब तमाम लोकांस कळविण्यात येते की, सदर वर नमूद शेतजमिनीमध्ये आमचे अशिलांचा अविभक्त हिस्सा असल्याने, सदरची शेतजमीन आमचे अशिलांच्या संमतीशिवाय कोणीही कोणाकडूनही विकत घेऊ नये अथवा त्याबाबतचा कसलाही व्यवहार करू नये. याउपर तसे केल्यास सदरचा व्यवहार हा बेकायदेशीर ठरून, तो आमचे अशिलांवर बंधनकारक असणार नाही. तसेच सदर व्यवहारातून कोणाचीही फसगत अथवा फसवणूक झाल्यास त्यास आमचे अशिल अथवा इतर वारसदार जबाबदार असणार नाहीत. कोणाचीही फसगत होऊ नये म्हणून सदरची सावधानतेची जाहीर नोटीस दिली आहे. सदरची नोटीस आज रोजी सोलापूर मुक्कामी दिली आहे.

ही सावधानतेची जाहीर नोटीस दिली. ता.३१/१/२०२५

**अशिल : सौ.सुधा उर्फ प्राजक्ता प्रशांत बडवे**
रा.५४१, उत्तर कसबा, चौपाड, सोलापूर. मो.९८२२०९७६८८

**अशिला तर्फे ॲडव्होकेट : ॲड.प्रदीपसिंग मो. राजपुत**
ऑफिस : फ्लॅट नं.२ गिरीराज अपार्टमेंट, उत्तर सदर बझार, लष्कर, सोलापूर (मो.९८२२४९८५०२, ९१३००४२१५७)

साई
स्टील रेलिंग
& किचन ट्रॉलीज्
सर्व प्रकारचे
स्टील रेलींग, मेनगेट
किचन ट्रॉलीची सर्व कामे
खात्रीशीर व वेळेवर
करून मिळतील.

प्रोप्रा : प्रशांत जोशी मो.9881028191 / 7798304502
पत्ता : सय्यद कॉम्प्लेक्स, करमाळा-नगर रोड, बायपास, करमाळा.

घोलप
हार्डवेअर
कृषी संदर्भातील सर्व साहित्य मिळेल.

● प्लंबिंग मटेरियल
● नट बोल्ट
● मग ● झाडू ● टब
● कॅरेट ● ताडपत्री
● नायलॉन दोर
● प्लास्टीक कागद
संपर्क : मो.9922111204
पत्ता : रिलायन्स पेट्रोलपंपासमोर, बायपास रोड, शाहुनगर, करमाळा.

# सरपडोह येथे जुगार खेळणाऱ्यावर धाड - दीड लाखाचा ऐवज जप्त

करमाळा(सं.प्र.) : सरपडोह येथे जुगार खेळणाऱ्या सहा जणांना पोलीसांनी रंगेहाथ पकडले असून त्याच्याकडून १ लाख ५३ हजार २० रूपयाचा ऐवज जप्त केला आहे. हा प्रकार २५ जानेवारीला सव्वाचार वाजता सरपडोह येथील सर्पनाथ मंदिराच्या शेजारी घडला आहे. या प्रकरणी पोलिस कॉन्स्टेबल जोतिराम बारकुंड यांनी फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, की सरपडोह येथे जुगार खेळत असल्याची माहिती मिळाल्यावर पोलीस निरीक्षक विनोद घुगे यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक टिळेकर, पोलीस हवालदार ढेंबरे, श्री.शेख, पोलीस नाईक पवार, श्री.गोरे असे आम्ही २५ जानेवारीला दुपारी सव्वाचार वाजता तिथे गेलो असता, तेथे अभिमान भिकाजी भिताडे, गणेश नवनाथ पवार, शिवाजी कुड्या काळे, बाळनाथ चंद्रकांत नांगरे (सर्व राहणार सरपडोह), राजेंद्र गोरख गायकवाड व हनुमंत भागवत देवकर (रा.वरकटणे) हे जुगार खेळत असताना आढळून आले. त्यांच्याकडून ३ हजार २० रूपये रोख तर चार मोटारसायकली दीड लाख किंमतीच्या जप्त करण्यात आल्या आहेत. या प्रकरणी पोलीसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास चालू आहे.

# पाथुर्डी येथे जुगार खेळणाऱ्या तिघांवर कारवाई

करमाळा(सं.प्र.) : पाथुर्डी येथील गोकुळनंदन दूध डेअरीमध्ये जुगार खेळणाऱ्या तिघांना पोलीसांनी रंगेहाथ पकडले आहे. त्यांच्याकडून २७५० रूपये रोख जप्त केले आहेत. हा प्रकार २९ जानेवारीला दुपारी सव्वाएक वाजता घडला आहे. या प्रकरणी पोलीस कॉन्स्टेबल तौफिक रज्जाक काझी यांनी फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, की पाथुर्डी येथील गोकुळनंदन दूध डेअरीमध्ये काही लोक जुगार खेळताना आढळून आले. त्यामध्ये नागन्नाथ विठ्ठल दरगुडे, गोकुळ हंबीरराव माट, नागन्नाथ बापुराव सोनवळ (तिघे रा.पाथुर्डी) हे पैशावर जुगार खेळत होते. त्यांच्याकडून पत्त्याचा डाव व २७५० रूपये जप्त करण्यात आले आहे. या प्रकरणी पोलीसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

# दारू पिवून ट्रॅक्टर चालविणाऱ्यावर कारवाई

करमाळा (सं.प्र.) : दारू पिवून करमाळा–बायपास रस्त्यावर ट्रॅक्टर चालविणाऱ्या ट्रॅक्ट चालकावर करमाळा पोलीसांनी गुन्हा दाखल केला आहे. हा प्रकर २५ जानेवारीला दुपारी पावणेएकच्या सुमारास जयहिंद हॉटेल समोर बायपासला घडला आहे.

या प्रकरणी पोलीस कॉन्स्टेबल दिपक नागनाथ कांबळे यांनी फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, की करमाळा शहरातील वाहतुकीचे नियमन करत असताना बायपास रस्त्यावर जयहिंद हॉटेल समोर ट्रॅक्टर क्र.एमएच ०९ एफ व्ही ५७८२ वरील चालक रविकिरण शिवाजी खोत (रा.खडकलाट, ता.चिकोडी, जि.बेळगाव) हा ट्रॅक्टर अडथळत चालवत होता. त्यास थांबविले असता, तो दारू पिलेला आढळून आला. त्यामुळे त्याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला.

अशाचप्रकारे दुपारी एक वाजता याच ठिकाणी रामेश्वर बाबु सुरवसे (रा.श्रीपुर, ता.माळशिरस) हा ही आपल्या ताब्यातील ट्रॅक्टर दारू पिऊन चालविताना आढळून आला त्यामुळे त्याच्यावर ही गुन्हा दाखल करण्यात आली आहे.


महाराष्ट्रात प्रथमच...
गाडी,युपीएस इन्व्हर्टरसाठी नवीन बॅटरी घेताय ?
बॅटरी बदलण्यापूर्वी तुमच्या जुन्या बॅटरीची तपासणी करा
आणि बॅटरी बदलण्याच्या त्रासापासून चिंतामुक्त व्हा...
आता जुन्या बॅटरी चालतील नव्याप्रमाणेच्या !
२ चाकी | ३ चाकी | ४ चाकी | ट्रक | ट्रॅक्टर | JCB | पोक्लेन | सोलर
एकाच छताखाली सर्व प्रकारच्या सोलर इन्व्हर्टर बॅटरी सर्व्हिसेस
सुभद्रा पॉवर सोल्युशन्स
प्रोप्रा. श्री. स्वप्निल आदिनाथ आदलिंगे (ME Industrial Automation) 9172927337
श्री.आदिनाथ जयवंत आदलिंगे (मा.विस्तार अधिकारी, पंचायत समिती, करमाळा) 7588506719
शाखा नं.१ त्रिमुर्ती कुशन्स् शेजारी पुणे रोड,करमाळा / शाखा नं.२: मातोश्री कॉम्प्लेक्स, IDBI बँकेच्या पाठीमागे, श्रीदेवीचामाळ रोड, भवानी नाका, करमाळा.

# आयुष्यातील एक टप्पा यशस्वीरित्या पूर्ण झाल्याचा मनोमन आनंद : प्रा.डॉ.अश्विनी भोसले



फार्मसी मधील रसायनशास्त्र विषयात डॉक्टरेट (पीएच.डी) पदवी प्राप्त करून आज माझ्या आयुष्यातील एक टप्पा यशस्वीरित्या पूर्ण झाला; याचा खूप मनोमन आनंद होत आहे. आई-वडिलांच्या ज्या अपेक्षा होत्या, त्या पूर्णत्वास घेवून जाताना अभिमान वाटत आहे. मात्र त्याचबरोबर जबाबदारी वाढल्याची जाणीव होत आहे. आज मिळालेली डॉक्टरेटची पदवी मी माझ्या आई-वडिलांच्या चरणी समर्पित करते. ज्यांनी मला घडवताना खूप सारं काही दिले, ज्ञान दिले, संस्कार दिले आणि शब्दात वर्णन न होणाऱ्या बऱ्याच गोष्टी आहेत. या यशामध्ये माझे पती प्रा.संदीप, सासरे संभाजी ओहोळ सर, मुलगा अथर्व व मंगेश भाऊ, त्याची पत्नी सारीका यांचा मोलाचा वाटा आहे. त्याचप्रमाणे माझे गाईड डॉ.गणेश आंधळे, डॉ.राजेश पाटील व मार्गदर्शक डॉ.भास्कर इडगे, डॉ.प्राचार्य जेणेदर, डॉ.के.जी.भोत्रा, प्रा.सारीका ओव्हाळे यांचे योगदान बहुमोल असे आहे.

वास्तविक पाहता वैद्यकिय डॉक्टर होण्याचा मानस होता, परंतु अपेक्षित यश मिळाले नाही म्हणून खचून न जाता मनामध्ये नक्की ठरवलं होतं की डॉक्टर ही पदवी मिळवायचीच आणि त्या दिशेने वाटचाल केली. मात्र कौटुंबिक जबाबदारी पार पाडत हे पूर्ण करताना खूप समस्या आल्या. परंतु मी माझं स्वप्नं पूर्णत्वास घेवून जाण्याचा मनोदय मात्र कायम ठेवला. या दरम्यान सुर्यदत्ता कॉलेज ऑफ फार्मसी या ठिकाणी कार्यरत असताना भारत सरकार व लंड येथून युनायटेड किंगडम याचे पण पेटेंट या दरम्यान मिळवले. हे करत असताना रसायनशास्त्र मधून पीएच.डी करणे ध्येय ठेवले. परंतु ते प्राप्त होण्यास विलंब लागत होता. मात्र आयुष्यात अशी एखादी घटना घडते, तुमच्या भावनांना स्पर्श होवून तुम्ही परत एकदा उडण्यासाठी सज्ञ होता. तशी घटना माझ्या आयुष्यात आली आणि मला भारत सरकार व युनायटेड किंगडम लंडन यांचेकडून समाजपयोगी उपकरणे किंगडम याचे पण पेटेंट या दरम्यान मिळवले. हे करत असताना रसायनशास्त्र मधून पीएच.डी करणे ध्येय ठेवले. परंतु ते प्राप्त होण्यास विलंब लागत होता. मात्र आयुष्यात अशी एखादी घटना घडते, बनवल्याबद्दल दोन पेटंट मिळाले. त्यासाठी करमाळा तालुक्यातील प्रतिष्ठीत शहिद नवनाथ गात स्मारक समितीने मला २ मार्च २०२४ रोजी गुणगौरव पुरस्कार देवून सन्मानित केले. त्यावेळी समितीने जी ट्रॉफी मला प्रदान केली त्यामध्ये माझे नांव प्रा.डॉ.अश्विनी भोसले लिहिले बनवल्याबद्दल दोन पेटंट मिळाले. त्यासाठी करमाळा तालुक्यातील प्रतिष्ठीत शहिद नवनाथ गात स्मारक समितीने मला २ मार्च २०२४ रोजी गुणगौरव पुरस्कार देवून सन्मानित केले. त्यावेळी समितीने जी ट्रॉफी मला प्रदान केली त्यामध्ये माझे नांव प्रा.डॉ.अश्विनी भोसले लिहिले होते आणि त्यावेळी तो पुरस्कार घेताना मनामध्ये संकोच होता की, डॉक्टरेट नसतानाही आपण ट्रॉफी घेतोय; पण पुरस्कार स्वीकारताना मनोमन ठरवले any cost any how.. पुढील २ मार्च २०२५ पर्यंत मी माझ्या नावापुढे डॉक्टरेट ही पदवी लावणारच आणि आज मला अत्यंत आनंद होतो आहे, की २ मार्च २०२५ पूर्वीच मला डॉक्टरेट पदवी प्राप्त झाली.

या निमित्ताने एकच लक्षात आले, मनात तीव्र इच्छा असेल आणि कष्ट करण्याची तयारी असेलतर यश नक्की मिळते. माझा संशोधनाचा फायदा अगदी सामान्यातील सामान्य लोकांना होणार आहे जो की.. आज समाजामध्ये बीपी (ब्लड प्रेशर) चे प्रमाण मोठ्या प्रमाणावर आहे आणि त्यासाठी जे वेगवेगळे औषधे घ्यावी लागतात व त्यासाठी खूप आर्थिक भुर्दंड सहन करावा लागतो. त्यासाठी हे संशोधन एकच औषध कमी खर्चात सर्वसामान्यांना दिलासा देवून त्यांच्या व्याधी कमी करणार आहे. आणि याच बाबीचा मला अत्यानंद झाला आहे की.. मी समाजासाठी काही करू शकले, मिळालेल्या ज्ञानाचा वापर योग्य कारणासाठी करता आला हे मानसिक समाधान या माध्यमातून मला मिळाले. खरंतर हे कार्य एवढे नक्की मोठे नाही की त्यामुळे मी हुरूळून जाईल; पण यामुळे मी या आधारे आणखी संशोधन करू शकते, हा आत्मविश्वास माझ्या मनात आला आहे. त्याचबरोबर माझा तालुका व गाव या ठिकाणी असणारे माझे विद्यार्थी बांधव यांना यापासून प्रेरणा मिळेल आणि विद्यार्थ्यांना यामध्ये करियर करण्याची संधी उपलब्ध आहे याची जाणीव होईल.

यानिमित्ताने मला मार्गदर्शन करणारे ज्ञात-अज्ञात यांचे तसेच माझे आई-वडिल, सासरे, पती, मुलगा यांचे विशेष आभार व्यक्त करते. करमाळा तालुक्यातील सर्वच सामाजिक क्षेत्रात काम करणारे माझे मार्गदर्शक, सामाजिक संघटना यांचे पण यानिमित्ताने आभार व्यक्त करते. खरंतर खूप भावना मनामध्ये आहेत, मात्र त्या व्यक्त करणे शब्दात अवघड आहे. आपण दिलेल्या शुभेच्छा मन:पूर्वक नम्रपणे स्वीकार करते आणि भावी काळात असेच प्रेम, आशिर्वाद रहावे ही अपेक्षा.

***




महाराष्ट्र लोकसेवा मार्फत घेण्यात आलेल्या परीक्षेमधून खडकेवाडी येथील

**श्री.तुषार पांडूरंग शेळके**

यांची अन्न व औषध प्रशासन या विभागात **अन्न सुरक्षा अधिकारी** (राजपत्रित अधिकारी) पदी निवड झाल्याबद्दल...

हार्दिक अभिनंदन



शुभेच्छुक

**संगम स्वीट** प्रोप्रा : संदीप चुंग

पै.पंजाब वस्ताद चौक, करमाळा.

**आनंदऋषि नेत्रालय व्हिजन सेंटर**



रेबन गॉगल, फास्ट्रॅक, लाईफस्टाईल गॉगलचे स्टॉकिस्ट डिलर अनेक व्हारायटीसह सर्व चष्मे मिळतील.

• सर्व प्रकारचे कॉन्टॅक्ट लेंस, चष्मे, गॉगल्स विक्री व दुरुस्तीचे ठिकाण

fastrack

कॉम्प्युटरव्दारे मोफत नेत्रतपासणी करून मिळेल.



मोतीबिंदू बिनटाक्याची शस्त्रक्रिया : २२०० रू. (औषध व लेन्स खर्चासह)

दर महिन्याचा तिसरा रविवारी शिबीर वेळ : सकाळी १० ते २ पर्यंत

Ray-Ban गॉगल्स चे अधिकृत विक्रेते

श्री कमलादेवी ऑप्टीकल्स नगरपालिका शॉपींग सेंटर, दत्तपेठ, करमाळा.

प्रोप्रा : चाळक फिसरेकर मो.९४२३५३५४४२






पत्ता : श्रीराम मंदिर शेजारी, वेताळपेठ, करमाळा.

(9822058106, 7798307085)


जिल्हा उपप्रमुख
ता.अध्यक्ष
करमाळ्याचे सुपुत्र
श्री.मंगेश मंदाकिनी नरसिंह चिवटे
यांची उपमुख्यमंत्री मा.एकनाथजी शिंदे यांच्या विशेष कार्य अधिकारी (ओ.एस.डी) पदी नियुक्ती तसेच उपमुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष मंत्रालयाच्या कक्षप्रमुख पदी निवड झाल्याबद्दल...
ज्योतीताई शिंदे
अनिल पाटील
संजय शिलवंत
ता.उपाध्यक्ष
हार्दिक अभिनंदन !
गौतम रोडे
शुभेच्छुक
अंकुश जाधव
ता.अध्यक्ष- शिवसेना ओ.बी.सी. सेल (शिंदे गट)
अंकुश जाधव


प्रोप्रा : ममदापूरे बंधू
श्री गणेश
फॅमिली रेस्टॉरंट
Paneer Tikka Masala
महाराष्ट्रीयन
पंजाबी
चायनीज
तंदूर
स्वादीष्ट व रूचकर
'शुध्द शाकाहारी' जेवणाचे एकमेव ठिकाण
जेऊर रोड, महावीर उद्यान शेजारी, करमाळा.
मो.9922264931, 9730961492


नूतन उपसरपंच
सरपंच
वीट ग्रामपंचायतीच्या उपसरपंच पदी संजयमामा शिंदे गटाचे समर्थक
मा.श्री.हेमंत आवटे
यांची 'बिनविरोध' निवड झाल्याबद्दल
हार्दिक अभिनंदन !
शुभेच्छुक
ग्रामपंचायत सदस्य, वीट
वीट विकास फाउंडेशन
समस्त ग्रामस्थ, वीट
राजे ग्रुप, वीट
हेमंत आवटे
महेश गणगे